# एव्हरेस्ट बेस कॅम्प : आठवणी!

**२५ ऑक्टोबर बुधवार**
**पहिला दिवस काठमांडू**

पहाटे साडेपाच वाजता जाग आली. उठून बसलो. रात्री दीड वाजता रेखाने 'वेब चेक इन्' करून ठेवले होते. काही ना काही छोटी-मोठी कामे करत ती पहाटे तीन वाजता झोपली आणि लगेच पाचला उठली. पटापट सारे आवरून तिने चहा केला. पराठे केले. ते व्यवस्थित सोबत बांधून घेतले. साडेसात वाजता बाहेर पडायचे होते. रात्री 'ओला-उबेर'च्या संपाची बातमी होती. त्यामुळे काळजीत पडलो होतो पण सुदैवाने सकाळपर्यंत काही तडजोडी होऊन त्यांची सेवा नीट सुरू झाली होती.

सारी तयारी झाली आहे याची खात्री करून क्षणभर निवांत बसलो. मोबाईलवर निवडक लेखांचे संकलन करून ठेवले आहे. त्यातील एक आवडता लेख काढून वाचला. पाच मिनिटे मेडिटेशन केले. प्रसन्न वाटले. पुन्हा सर्व तयारीवरून नजर फिरवली. दोघांचेही फोन चार्ज करून घेतले. चार्जर घेतला. बॅगा घेऊन बाहेर पडलो. आशय आम्हाला सोडायला आला. खाली येतोय तोवर 'ओला' आली होती.

अशा तऱ्हेने सकाळीच अंधेरी सोडले.

आठ वाजता विमानतळ. सिक्युरिटी, सामान तपासणी, इमिग्रेशन असे सोपस्कार झाले. आम्ही 'एव्हरेस्ट बेस कॅम्प'ला जात आहोत याचे इमिग्रेशन काउंटरवरील अधिकाऱ्याला खूप कौतुक वाटले. तसे त्याने बोलून दाखवले. सकाळी सकाळी आपले कोणीतरी कौतुक करीत आहे या विचाराने सुखावलो.

हा माझा वाढदिवस. 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये फोटो प्रसिद्ध झाला होता. शुभेच्छांचे फोन आणि संदेश येत होते. खूप उत्साहात होतो. मी कधी वाढदिवस साजरा करत नाही पण आज एकाच दिवशी मी भारत आणि नेपाळ या दोन देशात असणार हा एक मस्त योग होता!

प्रथमच देशाबाहेर जात होतो. विमानतळावरून फोन करून 'गिरीप्रेमी'चे अंकित सोहनी यांच्याशी बोललो. माझी प्रसन्न आणि उत्तेजित भावस्थिती त्यांना सांगितली. ते म्हणाले "हाच उत्साह शेवटपर्यंत टिकवून ठेवा!" असे प्रोत्साहन हा त्यांच्या व्यावसायिक स्ट्रॅटेजी चा भाग होता हे स्पष्टच आहे.

या 'ट्रेक'साठी आमच्या सोबत विमानात सायली शेट्ये, देवेंद्र केळकर आणि साहील सुरा असणार होते. ते तिघेही पुण्यावरून आले होते. विमानतळावर त्यांची भेट झाली. सायली ही भ्रमंतीची आवड असणारी २५ वर्षे वयाची तरुणी. ती जपानी भाषेची प्रशिक्षक म्हणून काम करते. देवेंद्र हा २७ वर्षांचा तरुण. त़ोही जपानी भाषेचा इंटरप्रीटर म्हणून काम करतो. त्याला गिर्यारोहणाची, गायनाची आणि प्रवासाची आवड. तर साहिल हा चोवीस वर्षे वयाचा, डिझाईनिंगमध्ये एम. टेक्. करीत असणारा हौशी भटक्या! त्याला चित्र, संगीत, गिर्यारोहणाची आवड. एव्हरेस्ट बेस्ट कॅम्प हा त्याचा पहिलाच मोठा ट्रेक. आम्ही या मुलांना आमचा परिचय करून दिला. त्यांच्या सळसळत्या उत्साहाचे आम्हाला तर आमच्या धाडसी वृत्तीचे त्यांना कौतुक वाटत होते. सगळे एकत्र चहा-कॉफी घेत गप्पा मारत बसलो.

साडेदहा वाजता बोर्डिंग सुरू होणार होते. सावधपणे त्या सूचनेची वाट पाहत होतो. जे गेट आधी ठरलेले  होते ते अचानक बदलण्यात आले. मग शोधाशोध करत दुसऱ्या गेटकडे जाऊन बसलो. असे प्रकार विमानतळावर नेहमी होतात त्यामुळे ॲलर्ट राहणे आवश्यक असते. अखेर विमान आले. बोर्डिंग सुरू झाले. आत जाऊन बसलो. साडे-अकरा वाजता विमान सुटेल अशी घोषणा झाली...

ज्या क्षणाची वाट बघत होतो तो जवळ आला. मी अंतर्बाह्य मोहरून गेलो होतो. विमानाने भरारी घेत आपली चाके पोटात घेतली आणि माझ्या कल्पनेचे पंख बाहेर पडले. हा माझा नेहमीचा अनुभव. सगळे आयुष्य डोळ्यासमोर तरळू लागले. डोक्यात भूत-भविष्याचा खेळ सुरू झाला. मधूनच 'बेस कॅम्प'चे कल्पनाचित्र डोळ्यासमोर तरळू लागले. लेखन- वाचनाच्या अन्य संकल्पित  प्रकल्पांविषयी मनात विचारांची जुळवाजुळव सुरू झाली...

तासाभराने विमानात पराठा-चटणी, चीझ-वेफर्स, कॉफी असे खाणे झाले. मुंबईतील महिलांचा एक ग्रुप नेपाळला फिरण्यासाठी चालला होता. त्यातील एक ताई रेखाच्या शेजारी बसल्या होत्या. त्यां दोघींच्या गप्पा रंगल्या.

थोड्यावेळाने वरून खाली पाहिले. वेगळ्याच प्रदेशात आल्याचे जाणवले. काठमांडू दिसू लागले. कालिदासाच्या मेघदुताला वरून अलकापुरी अशीच दिसली असेल; असा विचार मनात आला. सुखरूप उतरलो. 'गिरीप्रेमी'चे वरूण भागवत आणि 'पीक प्रमोशन' या नेपाळमधील गिर्यारोहण संस्थेचे प्रतिनिधी नवांग आम्हाला घेण्यासाठी आले होते.

काठमांडूची  समुद्रसपाटीपासूनची उंची १४०० मीटर. म्हणजे ४६०० फूट. अर्थात् थंडी चांगली पडली होती. नवांगने झेंडूच्या फुलांचे हार घालून आमचे स्वागत केले. ही तेथील नेहमीची परंपरा. 'एव्हरेस्ट बेस कॅम्प'ला जाणाऱ्या गिर्यारोहकांचे गळ्यात हार घातलेले अनेक फोटो पूर्वी पाहिले होते. आता आमचाच असा एक फोटो कोणीतरी काढत आहे याचे अप्रूप वाटले.

सर्वजण गाडीत बसून  हॉटेलकडे रवाना झालो. वाटेत जिकडे तिकडे देवनागरी लिपीतील, मराठी-हिंदीतील पाट्या पाहून आपण भारतातच आहोत की काय असे वाटत होते. हॉटेलमध्ये पोहोचलो. वेटरने पाणी आणून ठेवले. एक घोट घेतला तर ते बर्फासारखे थंडगार. मग गरम पाणी मागवले. मुंबईला परतेपर्यंत यापुढे आता गरम पाणी प्यावे लागणारे याची कल्पना आली.

प्रथमच सगळे एकत्र भेटत होतो. टूर लीडर वरूण भागवत धरून आम्ही एकूण १५ जण होतो. ओळख झाली.

शारंग थोरात आणि डॉ. ऋचा थोरात हे उभयता पुण्यातून आलेले. शारंग यांचे वय ५२ वर्षे. ते व्यवसायाने सॉफ्टवेअर इंजिनिअर. त्यांनी १९९८ साली मनालीहून गिर्यारोहणाचा प्राथमिक अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. गेली अनेक वर्षे हिमालयात आणि सह्याद्रीमध्ये भरपूर ट्रेकिंग केले आहे. डॉ. ऋचा थोरात या ४८वर्षे वयाच्या! त्या occupational therapist म्हणून पुण्यात स्वतःचे क्लिनिक चालवतात. ऑटीझम आणि सेरेब्रल palsy असलेल्या मुलांवरील उपचार हे त्यांचे काम. सह्याद्रीमध्ये त्यांनी पूर्वी ट्रेकिंगवजा भ्रमंती केली होती. लेहमधील अर्ध-मॅरॅथॉन पूर्ण करण्याचा अनुभव गाठीशी होता. शिवाय हिमालयातही त्यांनी हलके-फुलके गिर्यारोहण  केले होते.

३१ वर्षे वयाची पूजा शेजवळ आणि ३३ वर्षाचा प्रसाद तोंडारे हे दोघेही पुण्यात सॉफ्टवेअर इंजिनियर म्हणून काम करतात. आम्ही गिरीप्रेमीच्या 'प्रॅक्टिस ट्रेक'साठी सिंहगड येथे गेलो होतो तेव्हा या दोघांची ओळख झाली होती.

हेमंत सारडा हेही पुण्यातील ४५ वर्षे वयाचे हौशी गिर्यारोहक. त्यांनी बॅचलर ऑफ आर्किटेक्चर केले आहे. व्यवसायाने वास्तुविशारद. याच क्षेत्रात ते सल्लागार म्हणून काम करत आहेत.

मुलुंड येथील 'चक्रम हायकर्स'चे तीन गिर्यारोहक आमच्या या टीममध्ये होते. ५६ वर्षे वयाचे ठाण्याचे राजेश मोरवेकर. त्यांनी २०१२ पासून गिरीभ्रमण सुरू केले. पहिला ट्रेक कैलास मानसरोवरचा केला होता. एव्हरेस्ट बेस कॅम्प हा त्यांचा दुसरा ट्रेक. दुसरे मुलुंडचे महेश कदम. त्यांचा जन्म २८ ऑक्टोबर १९६८ चा. महानगरपालिकेत विभाग निरीक्षक या पदावर काम करतात. गेली ४० वर्षे ते ट्रेकिंग करत आहेत. त्यांचा पुढील वाढदिवस आम्ही वाटेत खुमजुंग येथे साजरा केला. तर तिसरे ५६ वर्षे वयाचे मुलुंडचेच विकास जोशी. ते पेट्रोलियम इंजिनियर. सल्लागार म्हणून काम करतात. अनेक वर्षे एकत्र ट्रेकिंग करत फिरत असतात. त्यांना 'त्रिदेव' म्हणायला हरकत नाही इतकी त्यांची घनिष्ठ मैत्री.

एम. एम. ऊर्फ मित्रदत्त मोहपात्रा असे आगळे नाव असणारे, प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचे, उत्साहाने सळसळणारे मूळचे भारतीय पण दुबईत राहणारे एक गृहस्थ ट्रेकसाठी आमच्यासोबत होते. वय ५८ वर्षे. व्यवसायाने एंजल इन्वेस्टर! नावीन्यपूर्ण व्यवसायांना भागीदारीत भांडवल पुरवठा करणे हे त्यांचे काम. असा व्यवसाय असणाऱ्या माणसाशी प्रथमच भेट होत होती.

सायली, देवेंद्र, आणि साहिल यांची मुंबई विमानतळावर आधीच भेट झाली होती.

वरूण भागवत हे आमचे टूर लीडर. 'गिरीप्रेमी'चे खंदे शिलेदार आणि पट्टीचे गिर्यारोहक. जन्म ९ मे १९९७ चा. त्यांचीही या ट्रेकच्या निमित्ताने पुण्यात आधी भेट झाली होती. 'मायक्रोबायोलॉजी'मध्ये त्यांनी एम. एस्सी. केले आहे. एका नामांकित संस्थेत संशोधक म्हणून काही काळ त्यांनी काम केले आहे. मात्र गिर्यारोहणाच्या छंदापाई ती नोकरी सोडून आता पूर्ण वेळ या कामासाठी त्यांनी स्वतःला वाहून घेतले आहे. 'गिरीप्रेमी'बरोबर हिमालयातील अनेक लहान-मोठी शिखरे त्यांनी पादाक्रांत केली असून विविध मोहिमांमध्ये त्याचा सक्रिय सहभाग असतो. एक ना एक दिवस एव्हरेस्ट शिखर गाठायचे हा त्याचा मनोदय त्यांच्याशी गप्पा करताना लक्षात आला होता. नजीकच्या भविष्यात ते यश त्यांना नक्की मिळणार आहे.

आम्हा दोघांविषयी थोडक्यात सांगायचे तर माझे वय ६७ वर्षे. मला फिरण्याबरोबर लिहिण्याची आवड. ललित लेखन, कथा, कविता, नाटक-सिनेमा असे माझे विविधांगी लेखन सुरू असते. तीस वर्षे महाराष्ट्र शासनात नोकरी करून २०१४ मध्ये निवृत्त झालो. रेखाही ३६ वर्षे स्टेट बँकेत नोकरी करून अलीकडेच निवृत्त झाली. मला सर्वत्र साथ देणारी, भटकंतीची आवड असणारी हौशी गृहिणी. तिचे वय ६१ वर्षे.

तर असे आम्ही पंधराजण. एकूण सारेच आपापल्या विषयातील कमी-अधिक जाणकार. शरीर-मनाने मजबूत. वृत्तीने भटके. वयाचा अंदाज घेतला तर मी आणि रेखा सर्वात सिनिअर. आमचे सर्वांना कौतुक वाटायचे. टीम छान जमली होती. परस्परांशी बोलताना कळत-नकळत अधिक परिचय होत होता. सारे एकमेकांच्या जवळ येत होते. 'बेस् कॅम्प'च्या धाग्याने साऱ्यांना एकत्र जोडले होते. प्रत्येकाच्या डोळ्यात ते स्वप्न स्पष्टपणे तरळताना दिसत होते.

'पीक प्रमोशन' या संस्थेचे प्रमुख श्री. पासंग/श्री. केशव हॉटेलवर आले होते. त्यांनी आम्हाला पुढील सगळ्या प्रवासाची माहिती दिली. आमच्या पुढील मोहिमेचे नेतृत्व 'गिरीप्रेमी'ऐवजी 'पीक प्रमोशन' मार्फत होणार होते. लहान-मोठ्या सूचना देऊन त्यांनी आम्हाला डफल बॅगा आणि स्लीपिंग बॅगांचे वाटप केले. पुढील मोहिमेसाठी लागणारे सामान डफलबागेत घ्यायचे होते तर मूळ बॅगा हॉटेलवरच ठेवायच्या होत्या.

“जेवण करून आराम करा, रात्री दीड वाजता राममेछाप साठी निघायचे आहे” ही सूचना कानी पडताच क्षणभर मी हादरलो. काठमांडू येथून अर्धा-पाऊण प्रवास करून पुढे विमानाने लुक्लाला जायचे आहे अशी माझी कल्पना होती. पण प्रत्यक्षात सुमारे पाच-सहा तासाचा प्रवास करावा लागणार होता. आधी नीट कल्पना आली नव्हती. माझाच काहीतरी गोंधळ झालेला असणार. आता जास्त विचार करण्यात अर्थ नव्हता. मी आणि रेखाने रात्रीचे जेवण त्याच हॉटेलमध्ये घेतले. शांतपणे झोप घेण्याइतका वेळ हाताशी नव्हता. थोडे अंग टाकतो तोच निघण्याची वेळ झाली.

*

**२६ ऑक्टोबर गुरूवार**
**दुसरा दिवस**

कडाक्याच्या थंडीत मध्यरात्री आंघोळ करणे शक्य नव्हते. बॅगा आधीच भरून ठेवल्या होत्या. नवांगचे दोन तरुण सहकारी पूर्णा आणि पूर्बा येऊन बॅगा घेऊन गेले. गरम कपडे चढवले, कानटोप्या, अवजड बूट घातले. गरम पाण्याचे जड थर्मास पाठ-पिशव्यांत घेतले. आता ते ओझे ट्रेक संपेपर्यंत कायम बाळगायचे होते.

अर्धवट झोपेतच बाहेर पडलो. हॉटेलच्या बोळकांडीतून मेन रोडपर्यंत थोडे चालत जायचे होते. निघालो. कुंद वातावरण. थंडीचा वाढता कहर.

रात्री दीडची वेळ तरीही बाहेर पर्यटकांची लगबग होती. हॉटेले सुरू होती. आपल्याकडे दिवाळीत करतात तशी रंगीबेरंगी प्रकाश योजना करून हॉटेले सजवलेली होती. दूरवर काही उत्तेजक संगीत कानी पडत होते. धुक्याच्या पार्श्वभूमीवर सारे वातावरण रहस्यमय चित्रपटातील एखाद्या दृश्यासारखे भासत होते. नेपाळमधील नाईट लाईफ प्रसिद्ध आहे!

फुटपाथवर घोळक्या-घोळक्याने स्त्रिया आणि पुरुष उभे होते. त्यांची आपापसात काही कुजबुज सुरू होती. एवढ्या रात्री ही मंडळी येथे काय करत असतील या प्रश्नाचे उत्तर कठीण नव्हते. काठमांडू हे जगभरातील पर्यटकांचे आवडते ठिकाण. येथे आले की निसर्गाच्या विराट दर्शनाबरोबर मौजमस्ती करण्याची संधीही भरपूर असतेच की!

एका गौरवर्णीय मुलीबरोबर एक नेपाळी गाईड लगट करत चालला होता. दोघेही झुलत-झुलत,युगानुयुगीचे प्रियकर असावेत तसे एकमेकाला आधार देत चालले होते. एकमेकांत पूर्णपणे बुडून गेलेले दिसत होते. आंतरराष्ट्रीय पार्श्वभूमीवरील एखाद्या कादंबरी-चित्रपटाची झलक त्यांच्या दोस्तीतून प्रतीत होत होती. क्षणभर विश्राम बेडेकर यांच्या रणांगण मधील बॉब आणि हॅर्टा आठवून गेले.

सारे एका मोठ्या गाडीत बसलो.

दोन-तीन दिवसाचा शीण अजूनही तसाच होता. विश्रांती नीट झाली नव्हती. त्यातच मध्यरात्री निघत होतो. गाडी पळू लागली तसतसे लक्षात येत गेले की आता मागचे दोर कापून टाकले आहेत. आपण स्वेच्छेने स्वीकारलेला एक खडतर प्रवास सुरू झाला आहे...

हळूहळू शहराच्या बाहेर पडलो. डोंगर कापून तयार केलेले सिमेंट काँक्रीटचे महाकाय रस्ते, अधुन-मधून सुरू असलेली राक्षसी बांधकामे असे पार करता करता शहरी भाग मागे पडत गेला. नागरीकरणाची ही राक्षसी प्रक्रिया जगभर सर्वत्र सुरू झालेली आहे हे लक्षात आले. पुढे माती, झाडे, डोंगरातील चढणीचे रस्ते असा दृश्यबदल होत गेला. पाच-सहा तासांचा खडतर प्रवास करून उजाडता उजाडता रामेछापला पोचलो.

एखाद्या छोट्या बसस्टँडवर असते तसे वातावरण होते. आम्ही पाठपिशव्या आणि डफल बॅगा घेऊन विमानतळ परिसरात पोहोचलो. बशीसारख्या एका खोलगट भागात ४७४ मीटर अर्थात १५५५ फुटावर उभारण्यात आलेला हा विमानतळ. चहुबाजूनी पर्वतांच्या रांगा. उजवीकडे वर वर जाणारा घाट रस्ता तर डावीकडे थोड्या अंतरावर वाहणारी संतोशी नदी. थंडीचा कहर होता.

देशविदेशातील अनेक पर्यटकांची गर्दी होती. जणू एक छोटासा आंतरराष्ट्रीय मेळावाच भरला होता. आजूबाजूला चहापानाची छोटी छोटी हॉटेले होती... लागूनच असलेल्या एका टपरीवर सँडविच, उकडलेली अंडी, चहा असा फराळ झाला.

नवांग आणि त्यांचे सहाय्यक पुढील कामाला लागले. तिकीटे घेणे, बॅगांची वजने करणे, सामान ट्रॉलीत भरणे, विमानासाठी नंबर लावणे अशी धावपळ सुरू झाली.

तारा,सीता,गरूडा अशा कंपनीची छोटी छोटी विमाने रनवेवर उतरायची. रांगेने पेट्रोल भरून घ्यायची. त्यात सामान चढवले जायचे. दहा-दहा, पंधरा-पंधरा जणांचे ग्रुप तयार असायचे. त्यांना आपल्या पोटात घेऊन छोटीशी धाव घेत विमाने एका पाठोपाठ एक आकाशात भरायची. छोटे छोटे पक्षीच आकाशात उडत आहेत असे वाटायचे. जत्रा असावी तसे वातावरण होते. आम्ही लहान मुलाच्या कुतुहलाने त्यात हरवून गेलो होतो.

तिकीटे मिळाली. आम्हाला तारा कंपनीचे विमान मिळाले होते. सामानाचे चेकइन् झाले. ते एका ट्रॉलीमध्ये भरून तेथील सहाय्यक ते धावपट्टीवर घेऊन गेले. आम्ही पर्यटकांच्या लाऊंजमध्ये जाऊन आमचा नंबर कधी येतो याची वाट पाहत बसलो. विविध देशातून आलेले सारेच गिर्यारोहक रांगा लावून उभे होते.

अठराजणांची आसन व्यवस्था असणाऱ्या त्या छोट्याशा विमानात चढलो. बसण्यासाठी खिडकीच्या बाजूने दोन रांगा होत्या. प्रत्येकाला खिडकी मिळेल अशी रचना होती. मला उजव्या बाजूला वैमानिकाच्या मागची जागा मिळाली. माझ्या मागे रेखा. समोरचा पडदा बाजूला केला तर पायलट आणि को-पायलट दिसत होते. म्हणजे मी उठून हात लांब केला असता तर पायलटच्या खांद्यावर ठेवू शकलो असतो.

घुर्रऽऽऽ घुर्रऽऽऽ आवाज करत धावपट्टीवरून गती घेत अखेर विमानाने आकाशात भरारी घेतली. थोड्या वेळाने किमोनोसारखे वस्त्र घातलेली एअर होस्टेस आली. तिने आमचे स्वागत करत चॉकलेट्स गोळ्यांचे वाटप केले.

खाली पाहिले तर उंचचउंच पर्वतरांगा, खोल खोल दऱ्या, हिमनद्या, छोटी छोटी गावे, केसात भांग पाडल्यासारख्या दिसणाऱ्या वाटा, उतारावरची रेखीव शेती, बर्फाच्छादित घरे, सुरु-देवदाराची झाडे, शिखरे, शुभ्र पाण्याचे गोठलेले तसेच हळूहळू पुढे सरकणारे प्रवाह आणि आजूबाजूला हाताच्या अंतरावर तरंगणारे ढग!

अथांग निळे आकाश, शुभ्र पांढरे ढग, त्यातून आरपार दिसणाऱ्या गडद हिरव्या पर्वतरांगा. कधी ढगांच्या वरून, कधी ढगांच्या आतून तर कधी ढगांच्या खालून तरंगत पुढे जाणारे विमान... स्वप्नही कधी इतके सुंदर पडणार नाही असे मनात आले. जीव सुखावून गेला खरे पण एका बाजूने तो मुठीत धरून बसलो होतो.

मधूनच विमानाचा थरथराट आणि छातीत धडधड व्हायची. रस्त्यात खड्डे असतात तशा आकाशात पोकळ्या! त्या पार करताना विमान डगमगायचे! तशाही परिस्थितीत त्या विमानाला 'आकाश-रिक्षा' असा शब्द मला सुचला आणि माझे मलाच हसू आले. हा प्रवास सर्वाधिक धोकादायक म्हणून का ओळखला जातो याची झलक क्षणोक्षणी प्रत्ययास येत होती.

रेखा आणि मी मागोमाग बसलो होतो. मी मधेच मागे वळून तिच्या चेहऱ्यावरील भाव पहायचो... लोक आपल्या बायकांना कुठे कुठे फिरवून आणतात आणि मी तिला कुठे आणले होते! कशासाठी आपण हे धाडस करत आहोत असाही विचार क्षणभर मनात येऊन गेला. स्वतःच्या शारीरिक आणि मानसिक क्षमतांची ओळख पटावी म्हणून एक अज्ञात शक्ती जणू पुढे पुढे खेचत नेत होती. माझ्या आग्रहाखातर तिने हे सारे मान्य केले होते. पुढील सारी तयारी तिनेच करून दिली होती. तिच्याविषयी मनात कृतज्ञता दाटून आली. बाहेरील दृश्ये पहात ती प्रवासाचा आनंद घेत आहे, हे पाहून छान वाटले. आपले एक स्वप्न सत्यात उतरत आहे याचा आनंद शब्दातीत होता.

लुक्लाचा विमानतळ हा तर जगातील सर्वात धोकादायक म्हणून ओळखला जातो. जेमतेम पंधराशे फूट लांबीची धावपट्टी. खालच्या टोकाला विमानाचे नाक टेकवायचे, हळूहळू चढत वरच्या भिंतीपर्यंत जायचे आणि तेथे डावी किंवा उजवीकडे एक छोटे वळण घेऊन थांबायचे. एखाद्या गल्लीतून मार्ग काढत आपल्या घराच्या तोंडाशी जशी आपण स्कूटर पार्क करतो तशी विमाने पार्क होत. त्यातच हेलिकॉप्टरांचे येणे जाणे सुरू असायचे. एकमेकांवर आदळतात की काय अशी भीती वाटायची. कोणत्या क्षणी पुढे काय वाढून ठेवले असेल याचा अंदाज येणे मुश्किल.

अखेर लुक्ला.

तेनझिंग-हिलरी विमानतळ.
२८६०मीटर अर्थात ९३८३फूट उंचीवरील जगातील सर्वात थरारक आणि धोकादायक विमानतळ.येथून एव्हरेस्ट बेस कॅम्प ट्रेकचा आरंभ होतो. पुढे जाण्याच्या परवानग्या इत्यादी सोपस्कार करत मजल दर मजल करत तेथून पुढे निघायचे असते....

हवामान चांगले असेल तरच विमान वाहतूक सुरू. नाहीतर प्रतीक्षा करत बसा. आणि हवेत गेल्यावर हवामान खराब झाले तर मधूनच परतण्याची पाळी. मग कधी रामेछाप,  कधी काठमांडू तर कधी आणखी काही वेगळे सरप्राईज! पुढे काय वाढून ठेवले आहे याचा अंदाज येत नाही; आणि निसर्गाला आव्हान कोण देणार? संध्याकाळ झाली किंवा आधीच अंधार पडू लागला की विमानाचा हा खेळही बंद!

उतरलो.

आजूबाजूला उंच उंच पर्वतरांगा आणि स्वच्छ सुंदर निळे आकाश. थंड बोचरी पण आल्हादायक हवा. सामान घेऊन आम्ही बाहेर आलो आणि शेजारी असणाऱ्या असलेल्या एका टी-हाऊसमध्ये विसावलो.

दोन-तीन मजल्यांचे लाकडात बांधलेले टी-हाऊस. एवढ्या उंचावर वाळू, सिमेंट, लोखंड अशा अवजड गोष्टी पोहोचवणे अशक्य. त्यामुळे लाकूड आणि पत्रा हेच तिकडे बांधकामाचे प्रमुख साधन. खालच्या माळ्यावर सामान ठेवून सगळेजण चहासाठी वर गेलो. वर ऐसपैस रेस्टॉरंट. खाली ढब ढब वाजणाऱ्या लाकडी फळ्या. बाजूला किचन. चहा आली. येथून पुढे जी चहा मिळणार होती ती आणि ‘लेमन टी’ नावाची! आले, लिंबू, मध घातलेली. मुंबई-पुण्याच्या तुलनेत चार कप भरतील अशी; अगदी भरपूर. काचेच्या पारदर्शक मगातून ती दिली जाते.  त्यामुळे ती अधिकच खुलून दिसते. सुंदर-तजेलदार, मन प्रसन्न करणारी शरीर उबदार ठेवणारी, पोषक. हळूहळू या चहाची गोडी लागली. पुढे सवय झाली.

चहापान होईतोवर नवांग आणि त्यांच्या टीमने पुढील तयारी सुरू केली. आमचे झोप्क्यो (छोटे याक) आले. त्यांच्या पाठीवर सामान लादून निघायचे होते. मध्ये थोडा मोकळा वेळ मिळाला. त्यात आम्ही आजूबाजूला एक चक्कर मारली. छोटी सुंदर बाजारपेठ. मी येडपटासारखा “खोबरेल तेल मिळेल का?” अशी दोन-तीन ठिकाणी चौकशी केली. ते अर्थात् मिळाले नाही. खोबरेल हा प्रकारच तेथे अनेकांना माहीत नव्हता. कसा असणार? आणि एवढ्या थंडीत गोठलेल्या खोबरेलचा तेथे उपयोग तरी काय? मलाच माझे हसू आले. आपण आता ‘दुसऱ्याच जगात’ येऊन पोहोचलो हे स्वतःला बजावले.

पाठपिशव्या, हातात काठी असे तयार होऊन सारे रांगेने मार्गाला लागलो. पिशवीमध्ये गरम पाण्याचे थर्मास, खाऊ, रेनकोट, जॅकेट, काही कागदपत्रे आणि अडचण आल्यास औषधे असा सर्व जामानिमा होता.

आज पहिल्या मुक्कामासाठी फाकडिंग येथे पोहोचायचे होते. या दिवशी चढाई फारशी नसते. उलट उतरत जायचे असते.

एका ठिकाणी अनेक पर्यटक घोळक्याने उभे असलेले दिसले. ती एक चौकी होती. तेथे आधारकार्ड वगैरे दाखवून पुढे जाण्यासाठीचा परवाना घ्यायचा होता. आवश्यक असणारी फी भरून नवांगने सगळ्यांसाठी परवानगी घेतली. आमचा सर्वांचा तपशील असणारी स्मार्ट कार्ड्स आम्हाला मिळाली आणि आम्ही पुढे चालायला सुरुवात.

आजूबाजूची झाडे-झुडपे, फुले-फुलपाखरे डोंगररांगा  पाहत हळूहळू चालू लागलो. पाठीवर सामान बांधलेले झोपक्यो, खेचरे, पोर्टर्स, गिर्यारोहक जाता-येताना दिसत होते. प्रत्येकजण आपापल्या तंद्रित... चालण्यात जणू बुडून गेलेला... कुणालाही दुसरी कसली विवंचना दिसत नव्हती. कसली धावपळ नव्हती,पळापळ नव्हती... होता फक्त एक निवांतपणा; निसर्गाच्या सानिध्यात माणसाला मिळणारी ती एक अमूल्य भेट!

या रस्त्याने नको चालायचे स्वप्न गेली कित्येक वर्षे पाहत होतो. ज्या मार्गाने एडमंड हिलरी, तेनसिंग एका अत्युच्च ध्येयाच्या दिशेने चालत गेले त्याच मार्गाने आपण चाललो आहोत याचे समाधान शब्दांच्या पलीकडचे होते.

मध्ये एका ठिकाणी डाळ-भात, कोबीची भाजी, पापड असे नेपाळी पद्धतीचे जेवण झाले.

दूधकोशी नदीच्या काठाने चालणे सुरू होते तिचा घोष मनात निनादत होता तिच्या शुभ्र पाण्याचे नर्तन, तिने घेतलेली वळणे मन मोहून टाकत होती. मी भारतातील अनेक नद्या पाहिल्या आहेत दूधकोशीविषयी खूप वाचले होते. ऐकले होते. आता समक्ष अनुभवत होतो...नद्यांच्या काठी माणसाची संस्कृती वसली. माणूस मोठा झाला. आपल्या उगमाशी आपण परत आलो आहोत अशी भावना मनात निर्माण झाली.

रमत गमत संध्याकाळच्या सुमारास फाकडिंगला पोहोचलो. ईटीनरीमध्ये लुक्ला ते फाकडिंग सुमारे तीन ते चार तासाचे अंतर दाखवले होते पण आम्हाला तेथे पोहोचायला जवळपास संध्याकाळ झाली. हिमालयात संध्याकाळ लवकर होत असते. आमचे सहकारी पुढे आणि आम्ही मागे. आमच्यात तासभराचे अंतर पडले होते. याचा अर्थ आम्ही उत्तम गतीने चालत होतो. जेवढे हळू चालू तेवढे आमचे वातावरणाशी जुळवून घेणे (acclimatization) गतीने होणार होते.

फाकडिंग हे दुधकोशी नदीच्या खोऱ्यातील २६०० मीटर्स अर्थात ८५६० फूट उंचीवर वसलेले खुंबू खोऱ्यातील छोटे गाव. लुक्लापासून वर आणि मोंजोपासून खाली असे वसलेले हे गाव युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांपैकी एक. लोकसंख्या जेमतेम ५५०. मुख्यतः शेर्पा आणि तमांग लोकांची वस्ती. ते सर्व तिबेटी बौद्धधर्मीय. पोटापाण्याचे साधन पर्यटन. त्यामुळे गावात पहावे तिकडे कमी-अधिक सोयीनी युक्त अतिथीगृहे, होमस्टे, हॉटेले.

हॉटेलमध्ये गर्दी होती. आपापल्या खोलीत बसण्यापेक्षा सर्वांनी हॉलमध्ये बसणे पसंत केले. पुढे तो एक रिवाजच ठरून गेला. त्या रेस्टॉरंटवजा हॉलमध्येच चहापान, नाश्ता जेवण असे सर्व होई. खोली फक्त अंग टाकण्यासाठी.

हॉलमध्ये गेल्या गेल्या गरम पाणी, काचेच्या पारदर्शक कपातील जिंजर लेमन हनी टी. ट्रेकिंगच्या मार्गावरचे दुपारचे जेवण साधेसुधे तर रात्रीच्या मुक्कामाचे जेवण प्रत्येकाच्या इच्छेप्रमाणे. मेन्यू कार्डावर अर्थातच कॉन्टिनेन्टल डिशेस असायच्या. जेवणापूर्वी नवांगने आमची ऑक्सिजन तपासणी केली. साठ-सत्तर-ऐंशी असे प्रमाण आले पण त्यामुळे काही बिघडणार नव्हते. चहापान सुरू असताना एकेकाच्या पसंतीनुसार रात्रीच्या जेवणाची, सकाळच्या नाश्त्याची ऑर्डर दिली गेली. मग गप्पा-गोष्टी. हास्यविनोद, आणि मग अर्थात आराम!

या क्रमाने पहिला दिवस पार पडला. तीन-चार दिवस नीट विश्रांती झाली नव्हती त्यामुळे खूप थकायला झाले होते. त्यात थंडी कडाक्याची होती. थर्मल, हॅन्ड ग्लोव्हज्,
कानटोपी आणि पायातील अवजड बूट अंगातून निघायचे नाव घेत नव्हते. बूट हे जणू शरीराचे एक सहावे इंद्रिय होऊन गेले होते...ते  फक्त झोपताना पायातून निघत.

***

**२७ ऑक्टोबर शुक्रवार/तिसरा दिवस**
**फाकडिंग ते नामचे बाजार (३४४०मी, ११२८६फूट)**

आकाश जेथे संपते...

पहाटे उठून सारे आवरले. आवरायचे म्हणजे काय तर प्रातर्विधी आटोपणे आणि दात घासून तोंड स्वच्छ धुणे. अंघोळीचा तर प्रश्नच येत नसे. प्रत्येक जण आपापले आवरून  रेस्टॉरंटमध्ये पोहोचत होता. नवांग आणि त्याचे साथीदार सतत लगबग करत असायचे. ब्रेकफास्ट साठी रात्रीच ऑर्डर दिलेली होती त्यामुळे सकाळी त्यात वेळ गेला नाही. भरपेट फराळ चहापान झाले आणि आम्ही बाहेर पडलो.

फाकडिंग वरून नामचे बाजारला जाताना वाटेत एक चौकी लागते. सागरमाथा नॅशनल पार्क परिसरात फिरण्यासाठी येथून परवानगी घ्यावी लागते. ही चौकी मी youtube वर अनेकदा पाहिली होती आणि आपण तेथे कधी जाणार याचा स्वप्न पहात होतो आज तो योग आला. आम्ही दोघांनी त्या चौकीत आणि चौकीच्या आसपास वेगवेगळ्या ठिकाणी फोटो काढले. तोवर नवांगने आवश्यक त्या परवानग्या घेतल्या आणि आम्ही सारे पुढे निघालो.

येथून वरचा सगळा भाग सागरमाथा राष्ट्रीय उद्यानाच्या अंतर्गत येतो. हा अर्थात संरक्षित भाग आहे. नेपाळमधील हे पहिले राष्ट्रीय उद्यान आहे. माउंट एव्हरेस्टच्या आसपासचा प्रदेश व्यापणारा हा भाग १,१४८ किमी  क्षेत्रफळाचा असून उत्तरेस तिबेटच्या सीमेपासून दक्षिणेस दूध कोसी नदी पर्यंत पसरलेला आहे. याच्या पूर्वेस मकालु बारून राष्ट्रीय उद्यान आहे. जुलै १९, १९७६ रोजी हे संरक्षित क्षेत्र म्हणून जाहीर केले गेले.

दूधकोशी नदी.

दूधकोशी ही नेपाळमधील प्रसिद्ध नदी. एव्हरेस्ट शिखर व परिसराचा दक्षिणेकडील पाण्याचा प्रवाह या नदीतून जातो.  ही नदी गोक्यो सरोवराजवळ उगम पावते व नामचे बझार, लुक्ला या शहरांजवळून वाहत सगरमाथा राष्ट्रीय उद्यानाच्या दक्षिणेकडून पुढे जाते. डॉक्टर शेखर पाठक म्हणाले होते की गोक्यो लेक जरूर बघा. तो आमच्या आयटीनरीमध्ये नव्हता. पुढे काय होणार हे माहीत नव्हते पण त्यांची आठवण झाली खरे.

त्या नदीच्या काठाने हळूहळू वर जाताना कल्पनातीत आनंद होत होता आजवर भारतातील अनेक नद्या पाहिल्या होत्या त्यांच्या काठी रमलो होतो मुक्काम केला होता त्यासंबंधी लिहिले होते पण आता दूधकोशीच्या सानिध्यात आलो होतो हा एक आशीर्वादच आहे अशा भावना मनात होत्या.

वाटेत जोरसाला येथे जेवणासाठी सारे थांबले होते. आम्ही पोहोचलो आजूबाजूला गर्द झाडी खाली खोल दरी आणि नदीतून वाहणाऱ्या पाण्याचा आवाज. दुपारचे जेवण ठरलेले. वाडगाभर भात. लोणचे-पापड. एक वाटी डाळ आणि चमचाभर कोशिंबीर. पिण्यासाठी गरम पाणी.  येथील एका मुलीला मी म्हटले, “पानी देना” त्यावर ती म्हणाली, “कितना?” तिच्या या प्रश्नावरून तिकडच्या भागातील पाण्याची किंमत माझ्या लक्षात आली. अर्थात आमचा सारा खर्च आता आमच्या संस्थेमार्फत होणार होता त्यामुळे ती काळजी नव्हती पण तरीही पाण्याची किंमत मोजावी लागते हे लक्षात आले.

पुन्हा सारे निघाले. आज खूपच खडतर आणि दूरचा प्रवास होता. नामचेला पोहोचणे म्हणजे आमच्यासारख्या नवख्या गिर्याकांसाठी जणू एव्हरेस्टला पोहोचण्यासारखे होते. वाटेत झुलते पूल लागायचे. मोठमोठ्या दाऱ्या पार करून एका पर्वतातून दुसऱ्या पर्वतावर जावे लागायचे. तारांच्या झुलत्या पुलांमुळे हा प्रवास चांगला सोपा झाला आहे पण  हे पूल नव्हते तेव्हा गिर्यारोहक कसे प्रवास करतील याचे आश्चर्य वाटायचे. हिलरी आणि तेनसिंग जेव्हा एव्हरेस्टवर गेले तेव्हा तर हे पूल नव्हते. एका पर्वतातून खाली उतरायचे तरी पार करायची आणि पुन्हा दुसऱ्या पर्वतावर ण सुरू करायचे असाच तो प्रवास होता. किती खडतर परिस्थितीतून त्यांना प्रवास करावा लागला असेल याची कल्पना आली.

नामचेला जाताना पंचवीस ती टक्के मार्गक्रमण करून झाल्यावर रस्त्यावर एकावर एक असे दोन झुलते पूल लागतात. एक जुना एक नवा. आता त्यापैकी एका रस्त्याने याक जातात तर एका रस्त्याने पर्यटक. अगदी लक्षात राहावे असे ते खास ठिकाण आहे तेथे खाली थांबून आम्ही आमचे फोटो काढले थोडी विश्रांती घेतली आणि हळूहळू वरच्या दिशेने जाऊ लागलो जेवताना

बाहेर पडलो तेव्हा केळकर त्या उंच पर्वताकडे पोट दाखवत म्हणाला आपल्याला तेथे जायचे आहे तेव्हा पोटात खड्डा पडला होता. वर जेथे आकाश संपते त्या ठिकाणी त्या पर्वताचा शिखर होते आणि मधल्या अनेक पर्वतांच्या रांगा ओलांडून तिथवर जावे लागणार होते.  क्षणभर काळजात धस झाले पण पुढच्या क्षणी स्वतःला सावरले. खरं म्हणजे मी फक्त एका पावलापुरता विचार करायचं फार दूर चा विचार केला तर विनाकारण त्रास व्हायचा त्याऐवजी एक एक पाऊल चालत राहायचे असे मी ठरवले होते तोच महत्त्वाचा धडा अनेक दिवसापासून गिरवत होतो आणि आणि त्याचाच आम्हाला खूप फायदा झाला.

वरवर आणखीन वर.
कधी वाट संपणार? डोंगरदऱ्या संपणार?
पुन्हा वर, आणखी वर!
अजून किती वर जावे लागेल? कधी संपणार हा प्रवास? आले... आले... असे वाटायचे तोवर आणखी एक नवीन पर्वत समोर उभा असायचा. मध्येच एखादे गाव लागले तर असे वाटायचे की संपला प्रवास पण तेथून पुन्हा क्षितिजापाशी नवे दुसरे गाव खुणावत असायचे कधीकधी विचार यायचा की काय भानगडीत पडलो आपण पण आता पर्याय नव्हता मागे वळता येतही नव्हते मागचे सारे दोर कापून टाकले होते. आकाशाच्या टोकाला संपणाऱ्या त्या शिखरावर ची निळा ही आणि तेथून फिरणारे ढग जणू आपले पाच टाकत आम्हाला वर वर खेचत होते.

संध्याकाळच्या सुमारास नामचेमध्ये पोहोचलो. गावात फिरताना पर्वताच्या टोकाशी खूप उंच देवदारांच्या वृक्षाखाली एक छोटी टपरी होती तेथे चहापान कोल्ड्रिंक ची व्यवस्था होती पण आता आम्ही गावात शिरणार म्हटल्यानंतर चहासाठी सरळ हॉटेलवर जाऊ असा विचार केला आणि हळूहळू पुढे निघालो. लवकरच हॉटेलमध्ये पोहोचू हा विश्वास होता. पण प्रत्येक ठिकाणी गंमत अशी असायची की डोंगरावर अगदी शेवटच्या टोकाला आमचे हॉटेल असायचे तेथे जाईपर्यंत जीव नकोसा.व्हायचा आणि एकदा हॉटेलात शिरले की ती आमची खोली त्या हॉटेलच्या अगदी वरच्या मजल्यावर दुसऱ्या टोकाला असायची. तिथेही पुन्हा उंच उंच लाकडी पायऱ्या चढत जावे लागायचे. एक एक पाऊल उचलले सुद्धा जीवावर यायचे पण इलाज नसायचा. ती मुले बिचारी धावपळ करत आमच्या खोलीत सामान आणून ठेवायची काही निरोप असेल तर लगेच पोहोचवायची पुन्हा सकाळी पिशव्या न्यायला हजर असायची.

नामचे बाजार.
३३४० मीटर्स अर्थात ११२८६ उंची. हे गाव म्हणजे शेर्पांची राजधानी. खुंबू विभागातील सर्वात मोठी बाजारपेठ. बहुतेक सारे शेर्पा पर्यटनाच्या व्यवसायात काम करणारे.

येथे सारे गिर्यारोहक दोन-तीन दिवस थांबून विश्रांती आणि हवामानाशी जुळवून घेतात. हे गाव हिमालयाचे प्रवेशद्वार म्हणून ओळखले जाते.  जगभरातील गिर्यारोहकांच्या गरजा पूर्ण करणारी अनेक निवासस्थाने आणि स्टोअर्स तसेच अनेक इंटरनेट कॅफे आणि अनेक रेस्टॉरंट्स येथे आहेत. तेथे एक आयरिश पब देखील आहे, जो जगातील सर्वात उंच आणि सर्वात दुर्गम आयरिश पब असल्याचे म्हटले जाते.

आम्ही प्रेयर व्हील्स फिरवत फिरवत वर गेलो हॉटेल आज सामान टाकून खाली एक चक्कर मारली पाण्याची एक बाटलीची किंमत विचारली ती दीडशे रुपये होती.

पूर्वनियोजित कार्यक्रमाप्रमाणे आम्ही नामचे बाजार येथे आम्ही दोन मुक्काम करणार होतो पण आयत्या वेळेला ते रद्द करून पुढे निघालो. खुमजुंग येथे मुक्काम करायचा असे ठरले. आणखी पुढे सरकल्यामुळे ते पुढील प्रवासाचे अंतर कमी होणार होते. आमची सर्वांची तब्येत व्यवस्थित आहे स्टॅमिना मजबूत आहे त्यामुळे पुढे जायला हरकत नाही असा निर्णय लीडरने घेतला होता. ही विशेषतः आम्हा दोघांसाठी आनंदाची बातमी होती. पुढचा अधिक खडतर असणारा ट्रेक या बदलामुळे आणखी सुसह्य होणार होता.

नामचे बाजार येथे पोहोचताना इतकी खडतर चढाई करावी लागली होती की कशाला आपण आलो,जाऊया परत असा विचार मनात यायचा पण पुढच्या क्षणी पुन्हा वास्तवाचे भान यायचे. मी मनाला बजावत सांगे परतीचे दोर आता कापून टाकले आहेत. शिवाय इतकी वर्षे आपण येथे येण्याचे स्वप्न बघत होतो मग आता परत फिरण्याचा विचार मनात का येऊ द्यावा, हे दिवस परत येणार नाहीत शिवाय अडचणी तर माणसाच्या पाचवीलाच पुजलेल्या असतात. परिपूर्ण अशी परिस्थिती कधीच नसते मग परिपूर्णतेचे स्वप्न बघण्यात काय अर्थ आहे अशी आम्ही मनाची समजूत घालायचो. शिवाय रात्री मुक्काम केल्यावर थोडी का होईना पण विश्रांती मिळायची आणि पुन्हा ताजे तवाने वाटायचे. आम्ही थकत होतो हे खरे आहे पण आमची तब्येत उत्तम होती आणि निर्धार पक्का होता. सकाळी उठलो की चहा फराळ करून सरळ मार्गाला लागायचे बाकी कसलाच विचार करायचा नाही असे ठरवले होते आणि ते भान आम्ही कायम राखले.

नवांग किंवा पूर्णा कोणीतरी एक मदतनीस सतत आमच्या सोबत असायचा. राजेश गाडगीळ यांनी उमेश झिरपे यांना फोन करून सांगितल्यामुळे त्यांनी वरूण भागवत यांनाही आमच्यावर ‘लक्ष ठेवण्या’च्या सूचना दिल्या होत्या. तेही अधून मधून आमच्या मागे थांबत आमचे निरीक्षण करायचे, विचारपूस करायचे. एकदा हॉटेलमध्ये पोहोचल्यानंतर मी त्यांना विचारले आमचे बरोबर चालले आहे ना? त्यावर ते म्हणाले “हो तुम्ही हळूहळू चालता त्यामुळे तुमचे ॲक्लमटायझेशन चांगले होत आहे.” हे ऐकून छान वाटले होते. अशी सारी टीम असल्यामुळे आमचे मनोधैर्य चांगलेच टिकून राहिले होते. आणि आम्ही पुढे पुढे चाललो होतो.

***

**२८ ऑक्टोबर शनिवार/चौथा दिवस**
**नामचे बाजार ते खुमजुंग (३७९०/१२४३०)**

सकाळ झाली.

सरळ खुमजुंगकडे (३७९०) निघालो.
आज समोर काय वाढून ठेवले आहे याची त्या क्षणी कल्पना नव्हती.

पण आता कसलाच विचार करायचा नाही असे ठरवले होते. पण आश्चर्यकारकरीत्या हा दिवस आयुष्यातील सर्वात सुंदर आओ सर्वात संस्मरणीय दिवस ठरला.

उंचावर चढून जायचे असेल तर हात आकाशाच्या दिशेने करून नवांग सांगायचा, “आज थोडा ‘ऐसा ऐसा’ जाना है” आणि सपाटीवरून चालायचे असेल तर त्याच्या हाताचा पंजा जमिनीला समांतर व्हायचा आणि तो म्हणायचा “आज थोडा ‘ऐसा

ऐसा' जाना है" या दोन वाक्यांव्यतिरिक्त त्याने फार काही कधी अधिक माहिती दिली नाही. उत्तम मार्गदर्शकाचे हे एक लक्षणच आहे. त्याला नेमके काय म्हणायचे आहे हे लक्षात येत नसेल कदाचित समोरच्या माणसाला उत्तर दिले एवढे समाधान त्याला मिळवायचे असेल. इतक्या भ्रमंतीनंतर ते लक्षात आले होते उगाचच आधी कोणाला घाबरून नाउमेद करायचे नाही असे त्याचे धोरण असेल. असो!

छान सकाळ.
प्रसन्न वातावरण.
आल्हाददायक हवा.
उबदार प्रकाश.

उंच पर्वतांच्या कुशीतून एक सुंदर पायवाट समोर आली.  तीन-चार पर्वतांतून ती जात होती. समोर अमा दबलम, ल्होत्से, नुप्त्से आणि माउंट एव्हरेस्ट ही शिखरे! मी, रेखा आणि पूर्णा हा आमचा मदतनीस असे आम्ही रमत-गमत आनंद घेत आल्हादायक हवेतून मार्गक्रमण करत पुढे पुढे जाऊ लागलो. आपल्यासमोर एव्हरेस्ट आणि बाकीची शिखरे आहेत याची कल्पनाच करवत नव्हती. अक्षरशः स्वर्ग फिका पडावा असा असे लोकेशन होते.

ज्या एव्हरेस्टचे स्वप्न इतकी वर्षे पाहत होतो तो याची देही याची डोळा पाहत होतो. तो क्षितिजापाशी पण जणू काही अगदी हाताच्या अंतरावर आमच्यासमोर उभा होता.  जवळपास तीन-चार तास आम्हाला खुणावत होता. जणू बोटाला धरून आम्हाला फिरवत होता. आम्ही दोघेही लहान मुलाच्या निरागसतेने, एका अनामिक ओढीने त्याच्याकडे निघालो होतो.

माझ्यासमोर आयुष्यातील सर्व सुंदर क्षणांनी फेर धरला.
समुद्रसपाटीपासून ते अगदी १७,६०० फूट उंचीपर्यंत विविध ठिकाणी आम्ही फिरलो होतो. ते सारे फिरणे आठवू लागले. प्रत्येक ठिकाणचा इतिहास भूगोल आणि परिस्थितीजन्य कारणे वेगळी होती. आम्ही समुद्रसपाटीवर म्हणजे शून्य उंचीवर फिरलो ब्रह्मगिरीवर फिरलो कळसुबाई वर फिरलो आणि आता एव्हरेस्टच्या समोर फिरत होतो. कळसुबाईचे शिखर ते एव्हरेस्टचा पायथा अशी भ्रमंती झाली होती यापलीकडे काही करायचे राहिले आहे असे वाटत नव्हते पण या साऱ्या प्रवासाने आता कोणत्याही मोठ्या आव्हानाला सामोरे जाण्याची शक्ती मनात निर्माण झाली होती हे खरेच. हरिहरेश्वरच्या किनाऱ्यावर त्या अथांग सागराचे दर्शन घेत असताना आपण किती छोटे आहोत हे लक्षात आले होते त्याला त्यांनी किनाऱ्यावरील खडकांना धडका मारून मारून तेथे गुहा तयार झाल्या होत्या त्या वाळूवरून फिरलो होतो जगण्याचा अर्थ लक्षात येत होता आणि आता इतक्या उंचावरून...३७९० मीटर.

हरिहरेश्वरच्या समुद्रकिनाऱ्यावर ज्या लाटा उचलून येत त्यांच्या मधील अफवा रंग कायमचा लक्षात राहिला एव्हरेस्ट बेस कॅम्पला जाताना शेजारी असणाऱ्या पहाडावरचा ब्ल्यू आईस पाहताना तोच एक्वा रंग नजरेसमोर येत होता एकाच पाण्याची दोन रूपे एक लिक्विड तर दुसरे हार्ड इतके हार्ड की त्यात खेळाडू गेले तरी जाणार नाही इतके कठण आणि दुसरे पाणी पण ते पाणी सुद्धा असे की हरिहरेश्वर येथेच किनाऱ्यावरील खडकांवर डोके आपण आपटून त्यांनी त्यात तयार केलेल्या गुहा पाहून आश्चर्यचकित झालो होतो त्याची आठवण झाली.

सकाळी दीड दोन तासांचा प्रवास झाल्यावर आम्ही एव्हरेस्ट व्ह्यू पॉईंट परिसरातून पुढे निघालो. जवळजवळ तीन तासांचा नितांतसुंदर, अविस्मणीय प्रवास. समोर अमा दाबलम, ल्होत्से, नुप्त्से आणि माउंट एव्हरेस्ट ही शिखरे! याची डोही याची डोळा

ती नजरेत साठवून घेत आम्ही दोघे पुढे पुढे जात राहिलो. आयुष्य सार्थकी लागल्याची जाणीव झाली. नवी शक्ती, नवे चैतन्य अंगात सळसळू लागले. पुढे पावलोपावली शरीर-मनाची परीक्षा सुरू झाली पण आता त्याची पर्वा नव्हती!

अंगावर कपड्यांचे चार चार थर असायचे. रात्री प्रसाधनगृहात जायचे तर त्या कल्पनेनेच अंगावर काटा यायचा. तेथील पाण्याचे बर्फ झालेले असायचे. पुन्हा सकाळी उठायची गडबड आणि नव्या पर्वतरांगांचे आव्हान पण तरीही सर्व आपण का करत होतो हा प्रश्न पुन्हा पुन्हा पडायचा. उत्तरही तयारच होते. त्या चेटूक करणाऱ्या मृगजळाकडे जाण्याची तृष्णा!ती  नसती तर जीवनाला अर्थ तरी असणार होता?

कलावंतालास साद घालणारे एक मृगजळ!

येथे जाण्याआधी ती सुंदर पर्वतकडा, समोर सारी शिखरे, मग पायऱ्या पायऱ्यांनी वर जावे लागणारे एव्हरेस्ट व्ह्यू हॉटेल तेथे आम्ही घेतलेली विश्रांती आणि खाल्लेले शेंगदाण्याची लाडू...हा आमच्या आयुष्यातील सर्वात सुंदर वॉक...समुद्रसपाटी ते सागर माथा सारे पाहून झाले...

अधून मधून घिरट्या घालणारी बाजूलाच उतरणारी हेलिकॉप्टरे दिसत होती.

तेथून खाली उतरू लागलो. लाल पिवळ्या तपकिरी मातकट हिरव्या पोपटी अशा विविध रंगी पानाफुलांच्या दुलईने झाकलेला पर्वत उतरत उतरत खुमजूंगला पोहोचलो. अगदी टोकावर अमा दबलम हॉटेल. समोर क्षितिजापाशी आम्हा दबलम आमच्या जणू स्वागतासाठी उभा. एवढे जबरदस्त दृश्य कधी सामोरे येईल असे वाटले नव्हते. सर्व थकवा दूर झाला खोली ताब्यात घेऊन सारे रेस्टॉरंट मध्ये गप्पागोष्टी करत बसलो. तिथे पोचल्या पोचल्या निखाऱ्यावर मांस भाजले जात असल्याचा खरपूस वास आला त्याने सगळ्या स्मृती ढवळून काढल्या एव्हरेस्ट बेस कॅम्प ला जाताना वाटेत नेपाळमधील एक प्रसिद्ध पदार्थ म्हणजे याक स्टिक याकच्या मांसापासून तयार केले जाणारे सूप प बार देखील फ्राय त्या वासाने मस्तक भणाणून गेले पण आम्ही ठरवले होते की आपले पोट सांभाळायचे आणि म्हणून आम्ही शाकाहारावर भागवत होतो पण त्या वासाने त्या वातावरणात मनावर जे गारुड केले ते कमालीचे होते. या हॉटेलवर आम्हाला डोंगराच्या बाजूची कोपऱ्यातली एक कोंदट खोली मिळाली त्यामुळे मन थोडे खट्टू झाले. पण स्वतःचीच समजून घातली एरवीही आम्ही फिरायला जाताना आपल्याला काही विशेष वागणूक मिळावी अशी अपेक्षा धरत नाही आम्ही दोघांनीही उत्तम ठिकाणी उत्तम पद्धतीने नोकरी केली पण त्याचा आम्हाला ॲडव्हान्टेज मिळावा असे आम्ही कधीही वागलो नाही इतकेच काय पण आमचे वय लक्षात घेता हे सीनियर आहेत यांच्या कालाने घेऊ या असा कोणी विचार करावा असे कधी अनुभवाला आले नाही आणि तशी अपेक्षाही आम्ही कधी धरली नाही असो कदाचित या विचारांचा फायदा हे पुस्तक वाचत असणाऱ्या सीनियर सिटीजन होऊ शकेल. सहसा कधी अशी वेळ येत नाही कधी कधी हे दोघे सीनियर आहेतहे रेस्टॉरंट येतील एक महिला शेर्पा चालवत होती.

येथेच महेश कदम यांचा वाढदिवस आम्ही साजरा केला आणि जेथे मोनेस्ट्रीमधील काही मुलांनी गाणे म्हटले होते तेच ठिकाण.

खुमजुंग हे जागतिक वारसा स्थळ असलेल्या सागरमाथा राष्ट्रीय उद्यानाच्या आत खुंबू उप-प्रदेशात आहे . हे गाव समुद्रसपाटीपासून ३७९० मीटर उंचीवर, खुंबिला पर्वताजवळ आहे.नामचे बाजारापासून खुमजुंग गाव फक्त १.५ किलोमीटर अंतरावर आहे.खुमजुंग आणि कुंदे या जोडगावे. पार्श्वभूमीवर माउंट एव्हरेस्ट, ल्होत्से आणि अमा दाबलाम.३,७९० मी (१२,४३० फूट) लोकसंख्या (२०११)

खुमजुंगमधील एका मठात कथित यतीची कवटी कवटी ठेवण्यात आली आहे. या गावात इंटरनेट आणि मोबाईल आणि लँडलाईन फोन यांसारखी आधुनिक संपर्क साधने आहेत. खुमजुंग शाळा सर एडमंड हिलरी यांच्या हिमालयन ट्रस्टने १९६१ मध्ये बांधली होती. शाळेची सुरुवात दोन वर्गखोल्यांनी झाली होती परंतु आता ती ३५० हून अधिक विद्यार्थ्यांसह प्री-स्कूल, प्राथमिक आणि माध्यमिक विभागांची पूर्तता करते.

***